॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
निसर्ग हाच खरा कायदा.

अहिल्यानगर | बुधवार, दि. ६ मे २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३५० वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# बस-स्कॉर्पिओचा अपघातात नेवासाचे चार ठार

## कल्याण-आहिल्यानगर महामार्गावरील घटना । मृतात भेंडा, वडाळा बहिरोबा येथील चौघांचा समावेश

**अहिल्यानगर । वीरभूमी –** कल्याण-आहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे टोकावडे येथे मंगळवार दि. ५ मे रोजी झालेल्या बस आणि स्कॉर्पिओ कारच्या भीषण अपघातात नेवासा तालुक्यातील भेंडा व वडाळा बहिरोबा येथील चार जणांचा मृत्यू झाला तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथील अंगणवाडी सेविका मीना कल्याण मडके (वय ५५), निता अशोक डूरे (वय ५५) या त्यांचे वडाळा येथील मावसभाऊ अविनाश रामचंद्र काकडे (वय ५८), अभिषेक भाऊसाहेब मोटे (वय ३८), मोनिका अभिषेक मोटे (वय ३२), आराध्या अभिषेक मोटे (वय १३), वेदांत अभिषेक मोटे (वय ३) व सलाबतपूर येथील मनीषा रामदास कोहक (वय ५०) हे सर्व नातेवाईक मंगळवार दि. ५ मे रोजी पहाटे वडाळा येथून स्कार्पिओ गाडीने आजारी असलेल्या नातेवाईकाला भेटण्यासाठी मुंबई येथे जात असताना सकाळी १०:३० वाजेच्या सुमारास विठ्ठलवाडी-कल्याण-आहिल्यानगरला जाणारी बस आणि स्कॉर्पीओ गाडीची धडक झाली.






विठ्ठलवाडी आगारातून कल्याण-अहिल्यानगरसाठी निघालेली एसटी बस व स्कार्पिओ गाडीची मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील टोकावडे-वैशाखरे हद्दीत समोरासमोर जोराची धडक होऊन अपघात झाला. या अपघातात भेंडा बुद्रुक येथील अंगणवाडी सेविका मीना कल्याण मडके (वय ५५) निता अशोक डूरे (वय ५५), वडाळा येथील अविनाश रामचंद्र काकडे (वय ५८) व अभिषेक भाऊसाहेब मोटे (वय ३८) यांचा मृत्यू झाला असून मोनिका अभिषेक मोटे (वय ३२), आराध्या अभिषेक मोटे (वय १३), वेदांत अभिषेक मोटे (वय ३) व सलाबतपूर येथील मनीषा रामदास कोहक (वय ५०) हे चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्यात मदत केली. जखमींवर अपघात स्थळानजीकच्या सरकारी रुग्णालयात उपचार करण्यात आले.

चारही मृतदेह शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. मीना मडके व डूरे यांचा भेंडा येथे तर अभिषेक मोटे व अविनाश काकडे यांच्या पार्थिवावर वडाळाबहिरोबा येथे रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. जखमींवर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एकमेकांचे नातेवाईक असलेल्या चार जणांवर काळाने झडप घातल्याने भेंडा व वडाळा बहिरोबा परिसरावर शोककळा पसरली आहे.

## SPOT NEWS

### राज्यातील शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याचे आदेश

**मुंबई –** राज्यातील शिक्षक भरतीची वाट पाहणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून अनेक महिन्यांपासून रखडलेली भरती प्रक्रिया आता वेगाने पुढे सरकणार असून राज्यभरात मेगा शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण विभागाने सर्व शाळांना ३१ मे २०२६ पर्यंत रिक्त जागांवर शिक्षक भरती करण्याचे आदेश दिले आहेत. या भरती प्रक्रियेत एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. केवळ सध्या रिक्त असलेल्या जागाच नव्हे, तर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य रिक्त पदांचाही समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे उपलब्ध पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. परिणामी अधिकाधिक पात्र उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार असल्याने या निर्णयाचे स्वागत होत आहे. भरती प्रक्रियेची वेळापत्रक देखील निश्चित करण्यात आले आहे. १ मे ते ३१ मे या कालावधीत सर्व शाळा व्यवस्थापनांनी त्यांच्या रिक्त पदांची माहिती 'पवित्र' पोर्टलवर नोंदवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### सहावीसाठी नवा अभ्यासक्रम

**मुंबई –** महाराष्ट्रात शालेय शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडणार असून इयत्ता सहावीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्याला राज्यस्तरीय सुकाणू समितीने मंजुरी दिली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या आधी इयत्ता दुसरी, तिसरी आणि चौथीच्या अभ्यासक्रमाला मंजुरी देण्यात आली होती. आता सहावीचाही अभ्यासक्रम नव्याने तयार करण्यात आला असून येत्या जूनपासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून तो लागू केला जाणार आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी निश्चित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित हा आराखडा तयार करण्यात आला असून त्याला सुकाणू समितीने मंजुरी दिली.

# लैंगिक शोषण करणाऱ्याचा पॅरोल बंद

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश । नसरापूर घटनेनंतर महाराष्ट्र कॅबिनेटचा मोठा निर्णय

**मुंबई । वीरभूमी –** पुण्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरणावरून संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणानंतर सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणानंतर आता महाराष्ट्राच्या आजच्या कॅबिनेट बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. लैंगिक शोषण करणा-या नराधमांना पॅरोल देऊ नका असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

आज मंत्रालयात कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असा कायदा केला होता. तो २-३ वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

मी स्वत: पीडितेच्या वडिलांशी दोनवेळा बोललो. मी त्यांना हे समजावून सांगितले, आपल्याला नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा करुन घ्यायची आहे. त्यासाठी वेळेत चार्जशीट दाखल होणे आणि केस चालणे, माननीय हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टीला फास्ट ट्रॅकवर नेत आहोत. लोकशाहीत आपल्या सगळ्यांना वाटते, अशा नराधमाला भरचौकात फाशी दिली पाहिजे. पण ते लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कोणालाही कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यादृष्टीने कोणताही कोणतीही पळवाट न ठेवता या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा कशी होईल याचा प्रयत्न राज्य सरकार करेल. न्यायालयातून हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तसे पत्र आम्ही पीडीतेच्या कुटुंबाला दिले आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते.

# स्वगणनेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा

## सभापती प्रा. राम शिंदे यांचेकडून स्वगणना करून जनतेस आवाहन

**अहिल्यानगर । वीरभूमी –** देशाच्या १६ व्या राष्ट्रीय जनगणनेला डिजिटल स्वरूपात प्रारंभ झाला असून, नागरिकांच्या सक्रिय सहभागातून ही प्रक्रिया अधिक सक्षम होणार आहे. प्रत्येक नागरिकाने स्वगणना प्रक्रियेत सहभागी होऊन देशाच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.



सभापती प्रा. राम शिंदे यांनी चौंडी येथे स्वगणना करून जनगणना प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी टॅबच्या माध्यमातून स्वतःच्या घरगणनेशी संबंधित सर्व माहिती भरल्यानंतर त्यांचा 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' तयार झाला. या प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेत त्यांनी नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन केले व ही पद्धत सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी आहे. दि. १ ते १५ मे या कालावधीत नागरिकांना स्वगणनेची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर दि. १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांकडून घरोघरी जाऊन जनगणना करण्यात येणार आहे.

जनगणनेच्या या उपक्रमामुळे अचूक व अद्ययावत माहिती संकलित होऊन शासनाच्या विविध योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे. डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया सुलभ, जलद व पारदर्शक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जाणकार नागरिक – सक्षम राष्ट्र ही भावना जपत प्रत्येकाने या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग व्हावे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वगणना ही महत्त्वाची पायरी असून, सर्वांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रा. राम शिंदे यांनी केले.

# नूतन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन ॲक्शन मोडवर

## अपुरे संख्याबळ तरी उपाययोजना करुन जिल्हा पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार



**अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्हा भौगोलिकदृष्ट्या मोठा आहे. गुन्ह्यांची संख्याही अधिक आहे. त्या तुलनेत पोलीस दलाकडे मनुष्यबळ अपुरे आहे. मात्र तरीही उपाययोजना करून आपण जिल्हा पोलीस दलाची प्रतिमा उंचावण्यासाठी प्रयत्न करू, पोलीस कर्मचाऱ्यांना चांगल्या वर्तणुकीसाठी प्रोत्साहित करू, अशी ग्वाही नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दोन दिवसापूर्वी पदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर त्यांनी जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडून कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. या पार्श्वभूमीवर ते आज पत्रकारांशी बोलत होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपअधीक्षक शिरीष वमने, गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी उपस्थित होते.

जिल्ह्यात अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे मोठ्या प्रमाणावर होतात. प्रत्येक तालुक्यात वेगळी आव्हाने आहेत. अपुऱ्या पोलीस मनुष्यबळातून बंदोबस्त पुरवावा लागतो. त्यामुळे कोणत्याही एका विशिष्ट विषयाला प्राधान्य देण्यापेक्षा परिस्थितीनुसार त्वरित कार्यवाही करण्यावर आपला भर राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस जनतेच्या सेवेसाठी आहेत. जनतेच्या तक्रारींचे निराकरण करण्याचे पोलिसांचे कर्तव्य आहे. सामान्य नागरिकांच्या तक्रारी पोलीस ठाण्यांच्या स्तरावरच निकाली काढण्याला प्राधान्य दिले जाईल. प्रत्येक पोलीस ठाण्यांना भेटी देऊन तेथील कामकाजाचा आढावा घेण्यात येईल. कोणत्या पोलीस ठाण्याबाबत तक्रारी असतील तर नागरिकांनी संपर्क करावा. त्यांना न्याय मिळवून देऊ असेही, त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात गावठी कट्ट्यांची खरेदी विक्री करणारी मोठी साखळी आहे. मध्यप्रदेशातून गावठी कट्टे आणले जातात, मात्र त्याच्या उगमस्थानापर्यंत पोलीस पोहोचत नाहीत, याकडे लक्ष वेधले असता मुम्मका सुदर्शन यांनी सांगितले की, परराज्यात गावठी कट्टे बनवून त्याची महाराष्ट्रात विक्री केली जाते. अशा ठिकाणांचा शोध घेऊन उगम स्थानावर कारवाई केली जाईल. त्यासाठी प्रसंगी विशेष शोध मोहीम राबवली जाईल.

■ मुम्मका सुदर्शन यांचा स्वभाव अत्यंत शांत, संतुलित आणि विवेकशील आहे. ते बोलण्यापेक्षा कृतीवर विश्वास ठेवतात. त्यांच्याकडे अधिकार आहे, पण गर्व नाही; जबाबदारी आहे, पण दिखावा नाही. त्यांची उपस्थितीच पोलीस दलासाठी प्रेरणादायी ठरते. त्यांचा मते कायद्यापुढे कोणीही मोठं नाही हीच त्यांची खरी ओळख आहे. त्यांची वाणी मृदू, पण कृती निर्णायक आहे . प्रशासनातील पारदर्शकता आणि नागरिकांप्रती जबाबदारी या दोन स्तंभांवर ते आपले नेतृत्व उभे करतात. अहिल्यानगर सारख्या राज्यातील सर्वात मोठ्या जिल्ह्यात त्यांच्या कार्याची छाप थोड्याच दिवसात दिसून येईल. ऑर्डर द्यायची नाही. प्रत्येक कार्यालयात अचानक जाऊन काम समजून घ्यायचे ही त्यांच्या कामाची अनोखी शैली आहे.

# SPOT NEWS

## पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. आळंदी रोड, चरहोली बुद्रुक (जि. पुणे) येथे हा सन्मान सोहळा पार पडला. दिघी येथील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद वाघ यांच्या हस्ते डोंगरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मानपत्र व स्मृतीचिन्ह पुरस्काराचे स्वरुप होते. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रपती पोलीस पदक विजेते सिताराम नरके, कार्यक्रमाचे अध्यक्ष उमेश चव्हाण, फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रशांत चव्हाण, सचिव जयश्री सोनवणे, गझलकार रज्जाक शेख, आनंदा साळवे, अभिनेते अतुल गुंजाळ आदी उपस्थित होते. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात विविध क्षेत्रांत सातत्यपूर्ण सामाजिक कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी विविध उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती निर्माण केली आहे. पै. नाना डोंगरे यांच्या बहुआयामी सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## अहिल्यानगरात १० मे रोजी खुल्या गटातील ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

जिल्ह्यातील खेळाडूंसाठी अहमदनगर जिल्हा थेलेटिक्स असोसिएशनच्या वतीने खुल्या गटातील (पुरुष व महिला) मैदानी थलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, १० मे रोजी सकाळी ७:३० वाजता वाडिया पार्क येथील जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेत १६ वर्षे पूर्ण झालेल्या पुरुष व महिला खेळाडूंना सहभागी होता येणार असून, जिल्ह्यातील सर्व इच्छुक खेळाडूंना मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. स्पर्धेत प्रथम दोन क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड केली जाणार आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा ३१ मे ते २ जून या कालावधीत पुणे विद्यापीठ पुणे येथे आयोजित केली जाणार आहे. विशेष म्हणजे, या स्पर्धेत मिळणारे राज्य गुणवत्ता प्रमाणपत्र हे नोकरीत ५ टक्के आरक्षणासाठी उपयुक्त ठरणार असून, राज्य व जिल्हास्तरीय सहभाग प्रमाणपत्र आर्मी भरतीसाठी देखील फायदेशीर ठरणार आहे. त्यामुळे खेळाडूंसाठी ही स्पर्धा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित खेळाडूंना आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळणार असून, राज्यस्तरावर झेप घेण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. स्पर्धेसाठी ऑफलाईन प्रवेश अर्ज स्पर्धेच्या दिवशी सकाळी ७:०० वाजेपर्यंत स्वीकारले जाणार आहेत. सहभागी खेळाडूंनी आपले मूळ आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य करण्यात आले आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात

### राज्य सफाई कर्मचारी आयोग अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर । जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती, पुनर्वसन, आरोग्य व सामाजिक सुरक्षेशी संबंधित सर्व प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. तसेच 'हाताने मैला उचलण्यास प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३' ची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांच्यासह सर्व नगरपालिकांचे मुख्याधिकारी व सफाई कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

अध्यक्ष श्री. डागोर म्हणाले की, सफाई कर्मचाऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध योजना राबवत आहे, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाने करावी. सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानजनक कामाचे वातावरण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या नियमित आरोग्य तपासणी, विमा संरक्षण, पाल्यांच्या शिक्षणासाठी सुविधा तसेच कौशल्य विकासाच्या माध्यमातून पर्यायी रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात यावा.लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार कामगारांच्या वारसांना त्वरित नियुक्त्या देण्यात याव्यात. तसेच सफाई कामगारांना किमान वेतन दरमहा विहित वेळेत मिळेल, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

सफाई कामगार हे नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणारे 'फ्रंटलाइन सैनिक' आहेत. त्यामुळे संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करून त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून लाभार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी व लाभ मिळवून देण्यासाठी तालुकानिहाय विशेष मोहीम राबवावी, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेंतर्गत सफाई कामगारांना मोफत सदनिकेचा लाभ व मालकी हक्क मिळवून देण्यासह त्यांच्या हिताच्या बाबींवर अधिक भर देण्यात यावा. तसेच जिल्हास्तरावरील समितीत अनुभवी अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी अध्यक्ष श्री. डागोर यांनी उपस्थित सफाई कामगारांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

## श्रीक्षेत्र नेवासा येथे उद्यापासून निःशुल्क वारकरी बालसंस्कार शिबिराचे आयोजन

**● नेवासा । वीरभूमी–**

श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, श्रीक्षेत्र नेवासा यांच्या वतीने तसेच सर्व संत-महंतांच्या आशीर्वादाने बालकांसाठी निः शुल्क 'वारकरी बालसंस्कार शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर गुरुवार, दि. ७ मे २०२६ ते गुरुवार, दि. २१ मे २०२६ या कालावधीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिर येथे पार पडणार आहे. या शिबिरासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

या १५ दिवसांच्या शिबिरात विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेतील विविध अंगांचे शिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम, योग व प्राणायाम, ज्ञानेश्वरी पाठांतर, हरिपाठ व अभंग गायन, थोर संतांची चरित्रे, संस्कृत श्लोक तसेच संस्कारपर प्रवचनांचा समावेश आहे.

या शिबिरात ह.भ.प. वेदांताचार्य देवीदासजी महाराज म्हस्के यांच्यासह अनेक नामांकित महाराज मंडळी, शिक्षकवृंद आणि संस्थेचे माजी विद्यार्थी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरात सहभागी होणाऱ्या मुलांचा वयोगट १० ते १६ वर्षे असा निश्चित करण्यात आला आहे. सर्व मुलांसाठी पांढरा गणवेश बंधनकारक आहे. सहभागी विद्यार्थ्यांनी येताना स्वतः चे अंथरूण-पांघरूण, ताट व तांब्या सोबत आणणे आवश्यक आहे. तसेच ज्यांना पखवाज किंवा हार्मोनियम शिकायचे आहे त्यांनी आपली वाद्ये स्वतः सोबत आणावीत. बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सोय संस्थेमार्फत करण्यात आली आहे.

या शिबिरात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ह.भ.प. ज्ञानदेव माऊली शिंदे (मोबा. ९८८१८५०११७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे कमिटी अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने केले आहे.

## धारणगाव-कोपरगाव रस्त्यावरचे खड्डे बुजवा : नगरसेवक इम्तियाज अत्तार यांची मागणी

**● कोपरगाव । वीरभूमी–**



शहरातील अत्यंत महत्वाच्या असलेल्या प्रभाग क्रमांक ०८ मधील निकृष्ठ दर्जाच्या झालेल्या धारणगाव-कोपरगाव रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे छोटे-मोठे अपघात होत असून दुर्दैवाने जर अपघातात एखाद्या निरपराध व्यक्तींचा बळी जावू शकतो त्यामुळे धारणगाव-कोपरगाव रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा ईशारा राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेला दिला आहे.

कोपरगाव शहरातील संजय नगर, सुभाषनगर, टिळक नगर परिसरातील अत्यंत महत्वाचा आणि गजबजलेला रस्ता म्हणून धारणगाव-कोपरगाव रस्त्याकडे पाहिले जाते.कोपरगाव शहरातील मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर वाहनांची व नागरिकांची मोठी वर्दळ असते.या रस्त्यावरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असून या स्मारकाच्या समोर देखील खड्डे पडलेले आहेत. ह्या रस्त्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी दोन कोटी निधी दिला असून या रस्त्याचे काम सत्ताधारी गटातील एका नगरसेवकाने आपल्या हस्तकाकरवी केले असून करण्यात आलेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. त्यामुळे काम होवून काही दिवसातच या रस्त्यावर खड्डे पडण्यास सुरुवात झाली होती त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने या निकृष्ठ दर्जाच्या कामाबाबत कोपरगाव नगरपरिषदेला विचारणा देखील करण्यात आली होती.

परंतु कोपरगाव नगरपरिषदेने त्याची दखल घेतली नाही व आता तर ज्यांनी या रस्त्याचे काम घेतले होते तेच सत्तेत जावून बसले आहेत त्यामुळे या निकृष्ठ दर्जाच्या रस्त्याची चौकशी होईल याची आशा कोपरगावच्या नागरीकांनी सोडलेली आहे. परतू कमीत कमी या रस्त्यावर पडलेले खड्डे तरी बुजवावे अशी माफक अपेक्षा कोपरगावच्या जनतेच्या वतीने नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेकडे केली आहे. मागील पावसाळ्यात याच खड्ड्यात साचलेल्या पाण्यात कागदी होड्या सोडून आंदोलन करणारे आता सत्तेत आहेत. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या प्रभागातील विकासकामांना निधी देण्यात दुजाभाव करून आमची जिरवण्याच्या नादात कोपरगावच्या जनतेची जिरवू नका आणि धारणगाव-कोपरगाव रस्त्यावर पडलेल्या खड्यांमध्ये अपघात होवून एखाद्या निरपराध नागरीकाचा जीव जायची वाट न पाहता तातडीने खड्डे बुजवा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल असा ईशारा राष्ट्रवादीचे नगरसेवक इम्तियाज अत्तार यांनी कोपरगाव नगरपरिषदेला दिला आहे.

# कोवळ्या कळ्यांचे रक्षण : समाज आणि कायद्यापुढील कठोर प्रश्न


**पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नरसापूर येथे चार वर्षांच्या चिमुरडीवर ६० वर्षांच्या नराधमाने अत्याचार करून तिला ठार मारले. आपल्या आजोळी सुट्टीसाठी आलेल्या या चिमुरडीला तिच्या आजोबांपेक्षाही मोठा असलेला हा नराधम तुला गोठ्यात गायीचे बछडे, वासरू दाखवतो असे सांगत तिला सोबत घेऊन गेला. आणि ती चिमुरडी आजोबा समजून त्याच्यावर विश्वास ठेवून आनंदाने बागडत-बागडत त्याच्यासोबत गोठ्यामध्ये जाताना सीसीटीव्हीत दिसत आहे. भोळ्या-भाबड्या, कोवळ्या लेकराला वाटले-आजोबा आपल्याला वासरू दाखवतील. या कुतूहलाने ती त्याच्यासोबत गेली. त्या कोवळ्या, निष्पाप कळीला काय माहीत होते हो की हा आजोबा तिला मृत्यूकडे घेऊन चालला आहे!**

तिथे त्या कोवळ्या चिमुरडीवर अत्याचार करून-जिची अजून तिच्या स्वतःसोबत ओळखदेखील झालेली नव्हती, हे जग कसे आहे आणि भविष्यात कसे असणार आहे हे काहीच माहीत नव्हते-त्या निष्पाप देहावर त्या ६० वर्षांच्या नराधमाने अत्याचार केला. दगडाने ठेचून तिला मारले आणि तिचा मृतदेह पोत्यात भरून शेणाखाली ते पोते गाडून ठेवले.

किती अवघड आहे ना स्त्रीजातीचे आयुष्य! आईने नऊ महिने नऊ दिवस तिला पोटात वाढवायचे, जन्म दिल्यानंतर तिला लहानाचे मोठे करताना कित्येक रात्री जागून काढायच्या, डोळ्यात तेल घालून तिला वाढवायचे-आणि अशा नराधमांनी कुठलाही संबंध नसताना तिचे हालहाल करून तिच्यावर अत्याचार करून तिला मारून टाकायचे. अनेक मुलींचे हाल करून त्यांना मारले जात आहे-हे आपण सध्या पाहत आहोत.

आई-बाबांनी तिला जन्म नराधमांच्या, राक्षसांच्या हातून मरण्यासाठी नक्कीच दिलेला नाही. आता तर कोवळ्या, चिमुकल्या मुलींनाच टार्गेट करून त्यांच्यावर बलात्कार करून त्यांना मारले जात आहे. त्यांना आमिष दाखवले जाते, कारण त्यांना या घाणेरड्या जगाबद्दल काहीच माहीत नसते. त्यामुळे त्या आमिषाला बळी पडतात.

पूर्वी मुलींना बाहेरगावी शिक्षणासाठी पाठवायला पालक घाबरत असत. आई-बाबांची नजर आपल्या लेकीवर सतत असावी, तिच्यावर कुणाची वाईट नजर पडू नये-या काळजीपोटी ते तिला बाहेरगावी पाठवत नसत. आणि लवकरच तिचे लग्न लावून दिले जात असे. मोठ्या जबाबदारीतून मुक्त झालो असे आई-बाबांना वाटत असे.



वीरभूमी

**सौ. आशा सुधीर साठे**

**सैनिकपत्नी, अहिल्यानगर**

**९६०४०५६९२८**

आता काळ भयानक होत चालला आहे. ज्या चिमुरडीच्या हातात अजून खेळण्यासाठी बाहुली असते, तिला या समाजाबद्दल काहीच माहीत नसते-कोण चांगले, कोण वाईट याची पुसटशीही कल्पना नसते-त्या कोवळ्या कळ्यांवर अत्याचाराचे प्रमाण वाढत चालले आहे.

महिलांनो, तुमच्या पोटी लेकीने जन्म घेतला असेल आणि तुम्ही नोकरी करत असाल, तर लेकीला वाचवण्यासाठी तिच्याकडे दुर्लक्ष होऊ नये. एकवेळ नोकरी सोडा, पण लेक वाचवा. पूर्वी गर्भात मुलींना मारण्याचे प्रमाण जास्त होते; पण आता कडक कायद्यामुळे कोवळ्या कळ्या गर्भात खुडण्याचे प्रमाण कमी झाले. मग आता कायदा का कमकुवत झालाय?

नरसापूरमधील चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी द्या, नाहीतर आमच्या ताब्यात द्या-अशी मागणी जनतेने करत रस्त्यावर आंदोलन केले. पण उलट पोलिसांनी जनतेवर लाठीमार केला आणि त्या नराधमाला सुरक्षितपणे व्हीआयपी सेवेतून गाडीतून घेऊन गेले.

या माणसाने याआधी स्वतःच्या पुतणीवर आणि एका वयोवृद्ध महिलेवर अत्याचार केला होता. तरीही तो सुटून आला. त्यामुळे त्याला कळून चुकले-बलात्कार केला तरी आपण सुटतो, काहीच होत नाही आपल्याला. जेलमधे फुकटचे जेवण मिळते आणि गुन्हा केला तरी कालांतराने आपली जेलमधून सुटकाही होते. हा माणूस समाजाला लागलेला कलंक होता स्त्री जातीवर त्याची सतत वाईट नजर होती तर त्याची सुटका व्हायलाच नको होती. चार वर्षाच्या कोवळ्या कळीला यावेळी त्याने टार्गेट केले. आपल्या लेकींना वाचवायचे असेल तर हा कुचकामी कायदा काहीच कामाचा राहिलेला नाही आणि जे खाकी वर्दीमधले जनतेचे रक्षक आहेत त्यांच्यावर तर जराही विश्वास राहिलेला चोर सोडून संन्याशाला फाशी द्यायचे काम सध्याचे पोलिस करत आहेत. पालकांनो आगामी काळात लेकीला वाचवण्यासाठी तलवारी जवळ ठेवण्याचीच गरज पडणार आहे जाग्यावर चौरंग्या करायचा. कारण कायदा आपला राहिलेलाच नाही. खर म्हणजे याचा लगेच एन्काऊन्टर व्हायला पाहिजे होता. पण तस होणार नाही, कारण आपल्या कायद्यात ते बसत नाही. आपल्या कायद्यात जवळ शस्त्र बाळगायची परवानगी नाही पण आगामी



काळात मुलींना शाळेतूनच तलवारबाजी शिकवण्याचे धडे द्यायला हवे आणि फक्त मुलींना स्वसंरक्षणासाठी जवळ तलवार बाळगण्याची परवानगी शासनाने द्यायला हवी. तुमच्या घरात लक्ष्मी जन्माला आली तिचे स्वागत तुम्ही खुप थाटामाटात करता ना तर मग तिला सतत तुमच्या डोळ्यासमोर ठेवा. कुणावरचं विश्वास ठेवू नका. अगदी नात्यामधील माणसांवर सुद्धा विश्वास ठेवू नका. कारण माणसाची नितीमत्ता खूप घाणेरडी होत चालली आहे. विश्वासपात्र कुणीच राहिलेले नाही. लहाणपणापासून कुणाकडून काहीच घ्यायच नाही, ही सवय मुलींना लावा. आपल्या बागेतील कोवळ्या कळ्या फुलात रूपांतर होण्याआधी कुणाला खुडवू देऊ नका. एक काम कमी करा, पैसा कमी कमवा पण आपली लेक वाचवा ...!

SPOT NEWS

## श्री मुलिकादेवी विद्यालयाचा बारावीचा उत्कृष्ट निकाल





**निघोज । वीरभूमी-**
पारनेर तालुक्यातील निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा निकाल ९६.७९ टक्के लागला असून कला शाखेचा निकाल ७९.३१ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत शिवराज सुनील कदम ८६.५० टक्के गुण मिळवून प्रथम, सृष्टी सतीश खोसे ८२.३३ टक्के (द्वितीय), शिवराज सुनील तांबे ७०.५० टक्के (तृतीय), प्राची राजेश लाळगे - ६९.१७ टक्के (चतुर्थ), ऋतुजा हिरामण जाधव ६३.६७ टक्के गुण मिळवून पाचवी आली. तर कला शाखेत आकांक्षा सुनील गाजरे ८२ टक्के गुण मिळवून प्रथम, मोक्षदा सुनील व्यवहारे ६२.३३ टक्के (द्वितीय), सृष्टी संतोष जावळे ६२.३३ टक्के (तृतीय), आरती चरपटी दिवसे ६१.३३ टक्के (चतुर्थ), वैभव कृष्णा वारे ५८ टक्के (पाचवा), तेजस्विनी लहू निचित ५७.३३ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार अ‍ॅड. दीपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे व सिताराम खिलारी, प्राचार्य अंकुश अवघडे, उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड, समन्वयक किरण पाडळकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# अहिल्यानगर शहरात 'ॲनिमल' झाला हाऊसफुल

### सिद्धार्थ जाधव यांच्या अभिनयाची जादू । नाटकातून 'दत्तू'चा संघर्ष रंगमंचावर जिवंत

**अहिल्यानगर । वीरभूमी -**
शहरातील नाट्यप्रेमींसाठी खास ठरलेला कबीर इव्हेंट्स आयोजित 'ॲनिमल' हा बहुचर्चित मराठी नाटकाचा प्रयोग सावेडी येथील माऊली सभागृहात हाऊसफुल ठरला. सिनेअभिनेता सिद्धार्थ जाधव यांच्या दमदार अभिनयाला नगरकरांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.



अश्वमी थिएटर्स व ताराराम प्रॉडक्शन निर्मित या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन महेश मांजरेकर यांनी केले आहे. नाटकातून मुंबईतील चंदेरी दुनियेत आपले नशीब आजमावण्यासाठी आलेल्या 'दत्तू' या तरुणाचा संघर्षमय प्रवास प्रभावीपणे उलगडण्यात आला आहे. गावातून अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन मुंबईत आलेल्या दत्तूच्या आयुष्यातील निरागसता, स्वप्ने, अपयश आणि वास्तवाचा सामना यांचा भावनिक पट नाटकातून रंगवण्यात आला आहे. दत्तूची प्रमुख भूमिका साकारणाऱ्या सिद्धार्थ जाधव यांनी शब्दोच्चार, देहबोली आणि भावनिक चढ-उतार यांमधून पात्राला जिवंत केले. त्यांच्या विनोदी प्रसंगांमुळे सभागृहात हास्याचा कल्लोळ उसळला, तर भावनिक प्रसंगांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे इतर पात्रे प्रामुख्याने मूक असूनही, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि हावभाव यांच्या माध्यमातून कथानक अधिक प्रभावी बनवण्यात आले आहे. दत्तूच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा ऑडिशनची धडपड, स्वप्नांची आस, अपयशाचा स्वीकार आणि कुटुंबीयांची आठवण अत्यंत वास्तववादी पद्धतीने साकारली आहे.

'ॲनिमल' हे नाटक एका सर्वसामान्य तरुणाच्या स्वप्नांची आणि संघर्षाची कहाणी आहे. 'दत्तू शिंदे' हा खेड्यातून आलेला, मनाने निष्पाप पण जिद्दी तरुण मुंबईत अभिनेता होण्याचे स्वप्न घेऊन येतो. मात्र, चंदेरी दुनियेतील वास्तव, स्पर्धा, नकार आणि मानसिक ताण यांचा सामना करताना त्याचे स्वप्न हळूहळू मृगजळ ठरते.

या नाटकातून समाजातील काही ज्वलंत प्रश्नांवरही भाष्य करण्यात आले. महिलांवरील अत्याचार, लहान मुलींवरील बलात्कार यांसारख्या घटनांच्या पार्श्वभूमीवर माणसातील क्रौर्य अधोरेखित करण्यात आले, तर जनावरांमध्ये जात-धर्म नसतो पण माणूस मात्र विभाजनात अडकला आहे, हा संदेशही प्रभावीपणे देण्यात आला. कोरोना काळातील प्रसंग, तसेच आंतरराष्ट्रीय घडामोडींवर हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करून प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडण्यात आले. नाटकात सिद्धार्थ जाधव यांच्यासह सिद्धार्थ साळवी, पंकज पंचारिया, हतिका अर्जुन, आदित्य पंढरे, संदीप जुवाटकर यांच्या मूक भूमिका प्रभावी ठरल्या. विशेषतः दत्तूचा 'मूक मित्र' ही भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी ठरली.

मध्यांतरावेळी कबीर इव्हेंट्सच्या वतीने संदीप कुसळकर यांनी सिद्धार्थ जाधव यांचे स्वागत केले. या कार्यक्रमासाठी संजय गुगळे यांचे सहकार्य लाभले असून, सुरज ढवळे, राम गोल्हार, पृथ्वीराज गोपाळघरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी सिद्धार्थ जाधव यांनी नगरकरांच्या नाट्यप्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, मराठी नाटकावरचे प्रेम आणि प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मी भारावलो आहे, असे सांगितले.

## आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालयात बारावी कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**शेवगाव । वीरभूमी-**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता बारावी परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर केला. या निकालात कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे कनिष्ठ महाविद्यालय, शेवगाव येथील विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले. कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत कनिष्ठ महाविद्यालयाकडून यथोचित सत्कार करण्यात आला.



कला शाखेमध्ये कु. साक्षी मच्छिंद्र निकम हिने ८६.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. साक्षी दीपक मगर हिने ८२.३३% गुण मिळवून द्वितीय, तर कु. खणक भरत गुप्ता हिने ७८.००% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला.

विज्ञान शाखेमध्ये कु. सिद्धी भीवसेन उंद्रे हिने ७८.५०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. अनुष्का संदीप चव्हाण हिने ७४.३३% गुणांसह द्वितीय, तर संग्राम अरुण काळे याने ७३.३३% गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

वाणिज्य शाखेमध्ये कु. श्रद्धा शांताराम जाधव हिने ८७.६७% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. चि. गौरव पंढरीनाथ पल्हारे याने ७०.१७% गुण मिळवून द्वितीय, तर वैष्णवी आबासाहेब साबळे हिने ६७% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

कला शाखेचा निकाल ५६.१६%, विज्ञान शाखेचा ९१.१६%, तर इंग्लिश मीडियम वाणिज्य शाखेचा निकाल ५३.३३% लागला. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण सरासरी निकाल ७४.६२% इतका आहे.

वाणिज्य शाखेतील कु. श्रद्धा शांताराम जाधव हिने शेवगाव तालुक्यात इंग्लिश मीडियम वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक मिळवला. तसेच कला शाखेतील कु. साक्षी मच्छिंद्र निकम हिने शेवगाव शहरातून प्रथम व तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. विद्याधरजी काकडे, माजी जि. प. सदस्या सौ. हर्षदाताई काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मण बिटाळ, संस्थेचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, शिक्षण विभाग प्रमुख प्रा. वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य संपतराव दसपुते, प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे, रवींद्र आगळे व अविनाश भागवत यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## शेतकऱ्यांना पीकविमा मदत आ. विवेक कोल्हे यांनी मानले शासनाचे आभार

### सीएसआर निधीतून स्मार्ट क्लासरूमसाठी १.३० लाखांची मदत

**कोपरगाव । वीरभूमी-**
कोपरगाव व राहता तालुक्यात मागील वर्षीच्या खरीप हंगाम २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे काढणीला आलेली पिके भुईसपाट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पंतप्रधान पिक विमा योजनेअंतर्गत उत्पादन आधारित नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली असून ही मदत थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती आ. विवेकभैय्या कोल्हे यांनी दिली आहे त्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्ता भरणे व शासनाचे आभार मानले आहेत.



गेल्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावांना मोठा फटका बसला होता. शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने काढणीच्या उंबरठ्यावर असलेली सोयाबीन, बाजरी, कापूस, तूर, तसेच चारा पिके यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेकडो हेक्टर क्षेत्रातील पिके पूर्णपणे वाया गेल्याने शेतकऱ्यांच्या आशा-अपेक्षांवर पाणी फिरले होते. आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांपुढे मोठे संकट उभे राहिले होते.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी सातत्याने महायुती शासनाकडे पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा यासाठी कोल्हे यांनी संबंधित यंत्रणांशी सातत्याने संवाद साधत पाठपुरावा कायम ठेवला.या प्रयत्नांना यश मिळत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

या आर्थिक सहाय्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून आगामी हंगामासाठी भांडवल उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता कमी होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत जमा झाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत आ. विवेकभैय्या कोल्हे यांचे आभार मानले आहेत तसेच प्रलंबित मंडलातील देखील मदत लवकर मिळावी अशी मागणी केली आहे.

# जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

### खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि बॅडमिंटनसाठी विशेष शिबिर; दोन टप्प्यात विद्यार्थ्यांना मिळणार मार्गदर्शन

**अहिल्यानगर । वीरभूमी-**
जिल्ह्यातील क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी आणि नवोदित खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने २० दिवसांच्या प्राथमिक व अद्ययावत उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले.

या प्रसंगी क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, संतोष वाबळे, प्रियंका खिंडरे, सोमनाथ गीताराम राऊत, बाणेश्वर क्रीडा मंडळाचे मार्गदर्शक गणेश वारुळे, विश्वंभरा प्रतिष्ठान बुऱ्हाणनगरचे रामेश्वर चिमटे, श्रीराम कुस्ती केंद्राचे मार्गदर्शक सोमनाथ राऊत तसेच कुस्तीपटू सौरभ मराठे आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात खो-खो, बॅडमिंटन, कुस्ती आणि कबड्डी या खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार असून शिबिर दोन टप्प्यात आयोजित करण्यात आले आहे. पहिला टप्पा ४ मे ते १३ मे तर दुसरा टप्पा १८ मे ते २७ मे या कालावधीत पार पडणार आहे. जिल्ह्यातील खेळाचा प्रचार व प्रसार वाढवणे, ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंना समान संधी देणे आणि गुणवंत खेळाडू घडवणे हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश आहे. या माध्यमातून खेळाडूंच्या शारीरिक व मानसिक क्षमतेचा विकास करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

ज्ञानेश्वर खुरंगे म्हणाले की, जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माध्यमातून आयोजित केलेले हे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर जिल्ह्यातील क्रीडा चळवळीला बळकटी देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षणाबरोबरच क्रीडाही तितकीच महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील अनेक खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता आहे, मात्र योग्य मार्गदर्शन व सुविधा मिळाल्या नाहीत तर ही प्रतिभा दडपून जाते. हेच लक्षात घेऊन आम्ही हे शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरातून खेळाडूंना केवळ खेळाचे तंत्र नव्हे, तर शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना यांचेही शिक्षण मिळणार आहे. प्रशिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन आत्मसात करून खेळाडूंनी स्वतःची शारीरिक क्षमता वाढवावी आणि उच्च स्तरावर पोहोचण्याचे ध्येय ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.




शिबिरामध्ये अनुभवी प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन दिले जात आहे. कुस्ती या खेळासाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, खो-खो साठी संतोष वाबळे तर बॅडमिंटनसाठी विशाल गर्जे यांनी खेळाडूंना प्रशिक्षण देत क्रीडा क्षेत्रातील संधी, तंत्र आणि फिटनेसबाबत सखोल मार्गदर्शन केले. याशिवाय खेळातील बारकावे शिकवून खेळाडूंना स्पर्धात्मक दृष्टिकोन विकसित करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

खो-खोचे प्रशिक्षण बाणेश्वर क्रीडा मंडळ, बुऱ्हाणनगर तसेच आबासाहेब काकडे विद्यालय, निर्मलनगर (शेवगाव) येथे होणार आहे. बॅडमिंटन व कबड्डीचे प्रशिक्षण जिल्हा क्रीडा संकुल, अहिल्यानगर येथे दिले जाणार आहे. तर कुस्तीचे प्रशिक्षण संभाजी राजे कुस्ती केंद्र, सावेडी आणि तालुका क्रीडा संकुल, बुऱ्हाणनगर येथे पार पडणार आहे.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## कर्जत - जामखेड तालुक्यात

# अखंडित वीज पुरवठ्यासाठी तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात

### सभापती प्रा. राम शिंदे । वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत वीज पुरवठ्याबाबत आढावा बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

कर्जत-जामखेड तालुक्यातील नागरिकांना अखंडित व सुरळीत वीज पुरवठा मिळावा यासाठी तातडीने परिणामकारक उपाययोजना अंमलात आणाव्यात, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

शासकीय विश्रामगृहात वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांसमवेत तालुक्यातील वीज पुरवठ्याबाबत आढावा बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस अधीक्षक अभियंता रमेश पवार, कार्यकारी अभियंता कौस्तुभ डबीर, उपकार्यकारी अभियंता प्रवीण वारे व प्रदीप कटकधोंड यांच्यासह कर्जत - जामखेड येथील पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

प्रा. शिंदे म्हणाले की, कर्जत-जामखेड परिसरात वारंवार वीज खंडित होणे, अनियमित लोडशेडिंग तसेच तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याचा थेट परिणाम शेतकरी, लघुउद्योजक, व्यापारी तसेच सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर होत असून, वीज पुरवठा व्यवस्थेत तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे.

विशेषतः सायंकाळी ६ ते १० या कालावधीत वीज पुरवठा अखंडित राहावा, यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.




वीज वितरण कंपनीने ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविणे, जुन्या वीजवाहिन्यांचे नूतनीकरण करणे तसेच तांत्रिक बिघाड त्वरित दुरुस्त करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे.

तसेच नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करून सेवा अधिक पारदर्शक व परिणामकारक करावी, असेही त्यांनी नमूद केले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढत असल्याने संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून नियोजनबद्ध काम करावे. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांना अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक सर्व बाबींची पूर्तता करावी, असे निर्देशही प्रा. शिंदे यांनी दिले.

## रयत सेवक मच्छिंद्र चाकणे यांची 'निष्ठावान गुणी रयत सेवक' पुरस्कारासाठी निवड

**निष्ठावान सेवेला मानाचा मुजरा**



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

आढळगाव येथील रयत शिक्षण संस्थेच्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील कर्मचारी मच्छिंद्र चाकणे यांची यावर्षीच्या माजी प्राचार्य एन. आर. माने निष्ठावान गुणी रयत सेवक पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल शिक्षणप्रेमींसह रयत परिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मच्छिंद्र चाकणे हे सन १९९० पासून रयत शिक्षण संस्थेत कार्यरत असून त्यांनी आपल्या सेवेत निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यदक्षता यांचा उत्तम आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात चांडगाव येथील शाखेत शिपाई पदावरून केली. त्या काळात नव्याने सुरू झालेल्या शाखेच्या विकासासाठी त्यांनी विना मोबदला काम करत मोठे योगदान दिले. शिपाई पदावर कार्यरत असतानाही त्यांनी लेखनिक म्हणूनही जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. त्यांच्या कामातील प्रामाणिकपणा, कष्ट आणि समर्पणामुळे त्यांनी शाखेच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावली.

चांडगाव व आढळगाव येथील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचे मूल्यमापन संस्थेकडून करण्यात आले असून त्यानंतरच त्यांची या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. सदर पुरस्कार ८ मे रोजी सातारा येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

या निवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, उत्तर विभाग इन्स्पेक्टर नवनाथ बोडखे, जनरल बॉडी सदस्य सुभाषलाल गांधी, खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, प्राचार्य भाऊसाहेब गदादे, पर्यवेक्षक विक्रम घालमे, ग्रामपंचायत सदस्य उत्तमराव राऊत, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य नानासाहेब बोळगे व राजाराम काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शरद शिंदे, उपाध्यक्ष अर्चना जाधव तसेच ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## डॉ.शेळके दांपत्याच्या वैद्यक आणि समाजसेवेचा भिंगारमध्ये गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

डॉ. भावना आणि डॉ. अरविंद शेळके दांपत्याने मागील ५ दशके अहिल्यानगरच्या पंचक्रोशीतील रुग्णांची आणि वंचितांची आपल्या ज्ञान आणि क्षमतांद्वारे निरपेक्ष सेवा केली. त्यांच्या संस्कारांना स्मरून त्यांची मुलगी डॉ. कविता करीर आणि मुलगा समीर यांनी डॉ शेळके यांचे घर सामाजिक उपक्रमासाठी समर्पित करून एकाद्भुत प्रेरणा समाजाला दिल्याचे प्रतिपादन नगर जिल्ह्याचे माजी पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांनी केले.भिंगार मधील डॉ. भावना आणि डॉ. अरविंद शेळके सेवा प्रेरणा केंद्राचे लोकार्पण २ मे रोजी झाले.



यावेळी यावेळी श्री.घारगे, भिंगार छावणी मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, भिंगार डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत गांधी, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष डॉक्टर सी. डी. मिश्रा, ज्येष्ठ स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. शैलजा निसळ आणि एचआयव्ही एड्स बाधितांसाठी गेली चार दशके कार्यरत डॉ. मार्सिया वॉरन , स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीचे संस्थापक प्रमोद मुळे, जनकशेठ अहुजा , डॉ. प्रीती आणि डॉ. हेमंत देशपांडे , डॉ.सुचित तांबोळी,भूलतज्ज्ञ डॉ. संगीता आणि डॉ.शिरीष कुलकर्णी, रेडिओलॉजिस्ट डॉ. स्वाती आणि डॉ. सुहास घुले आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

स्नेहालय संस्थेस डॉ. शेळके यांच्या दोन्ही मुलांनी आपल्या आई-वडिलांची वास्तू सेवाकार्यासाठी सुपूर्द केली. येथे संकटग्रस्त महिलांसाठी स्नेहाधार हेल्पलाइन, कुटुंब स्वास्थ्य आणि समुपदेशन केंद्र, किशोरवयीन मुला-मुलींसाठी करियर गायडन्स आणि समुपदेशन, अभ्यासिका, वैद्यकीय तपासणी आणि सेवा प्रशिक्षण शिबिरे असे उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती स्नेहालयाच्या जयाताई जोगदंड आणि डॉ. प्रीती भोम्बे यांनी दिली. वडारवाडी गावाच्या हद्दीत विजय लाईन्स रस्त्यावर, कावेरी रुग्णालया शेजारी हे केंद आहे.भिंगार छावणी, नागरदेवळे, वडारवाडी, आलमगीर, मेहेकरी, शहापूर या गावांच्या पंचक्रोशीसाठी स्नेहालयाचे हे केंद्र काम करील.

यावेळी डॉ. शैलजा मिसळ म्हणाल्या की, डॉ. भावना आणि डॉ. अरविंद शेळके यांनी गरीब आणि गरजू रुग्णांची सेवा करताना कधीच आर्थिक अपेक्षा ठेवल्या नाहीत. कॅन्टोन्मेंट हॉस्पिटलची जबाबदारी सांभाळत असताना बाहेरच्या जिल्ह्यांमधील गरीब आणि भटके विमुक्त समाजाचे लोक अनेकदा प्रसुतीसाठी या हॉस्पिटलच्या परिसरात तळ ठोकत. तेव्हा कोण , कुठला असा विचार न करता शेळके दांपत्याने अहोरात्र आपले कर्तव्य निभावले. अत्यल्प संसाधने आणि मनुष्यबळ असताना रुग्णांचा विश्वास त्यांनी सार्थ ठरवला.

स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी, रोटरी क्लब, वैद्यकीय व्यावसायिकांची संघटना , भिंगार मधील कार्ड क्लब, अहमदनगर क्लब अशा संस्थांचे विश्वस्त आणि देणगीदार म्हणूनही शेळके दांपत्याची निरपेक्ष भूमिका या संस्थांच्या प्रतिनिधींनी यावेळी आवर्जून नमूद केली..

डॉ. अरविंद शेळके यांची बहीण सुलक्षणा कार्येकर यांनी सांगितले की, कुटुंबात कोणाचाही आधार नसल्याने पाथर्डी गावातील मामा वसंतराव आणि प्रसन्नकुमार शेवाळे यांच्या कुटुंबाने शेळके भावंडांना सांभाळले. लोकांची सेवा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणून डॉक्टर होण्याची प्रेरणा या दोन्ही मामांनी दिली आणि मदतही केली. ज्या समाजाच्या जीवावर आपण विकसित होतो, त्याला कधी विसरू नये हा डॉ.शेळके यांचा संस्कार त्यांच्या मुलाने आणि मुलीने त्यांच्या स्मरणार्थ सेवाकार्य उभे करून सार्थ ठरवला, असे कार्येकर म्हणाल्या. डॉ. अंशू मुळे यांनी आभार मानले.

# समर कॅम्प प्रत्येक छोट्या शहरांमध्ये आयोजित होणे गरजेचे

### डॉ. संदीप पवार । पाथर्डी शहरातील पार्थ समर कॅम्पचा यशस्वी समारोप

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पूर्वी समर कॅम्प मोठ्या शहरांमध्ये आयोजित केले जात. उन्हाळ्याची सुट्टी लागली की समर कॅम्प सुरु होत. खेड्यापाड्यातील, गावातील तसेच छोट्या शहरातील लहान मुलांना आर्थिक अडचणींमुळे व कौटुंबिक कारणांमुळे या शहरांमध्ये जाऊन समर कॅम्पमध्ये सहभागी होणे शक्य होत नसे. मागील वर्षीपासून येथील अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठानने पाथर्डीसारख्या छोट्या शहरामध्ये पार्थ समर कॅम्पच्या माध्यमातून शहरातील बालगोपालाना अभ्यासाच्या तणावातून मुक्त करून मनोरंजनात्मक उपक्रम शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. प्रतिष्ठानने आयोजित केलेला पार्थ समर कॅम्प हा स्तुत्य उपक्रम असून समर कॅम्प ही लहान मुलांसाठी संस्कार शिबिरेच असतात. म्हणूनच उन्हाळी सुट्टीमध्ये अशी शिबिरे प्रत्येक छोट्या शहरांमध्ये आयोजित होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन डॉ संदीप पवार यांनी केले.

ते येथील विवेकानंद विद्या मंदिरच्या प्रांगणात अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान आयोजित पार्थ समर कॅम्प २.० च्या समारोपप्रसंगी बोलत होते. यावेळी मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविताताई आव्हाड, आरोग्यदीप हॉस्पिटलचे संचालक अभिजित पवार, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव दिलीपराव गर्जे, कुणाल आव्हाड, अशोकराव चोरमले, प्राचार्य डॉ. बबन चौरे, प्रतीक्षा आव्हाड, डॉ. विजय देशमुख उपस्थित होते.

डॉ. संदीप पवार पुढे म्हणाले, पार्थ समर कॅम्प हा फक्त विविध खेळांपुरता मर्यादित न राहता या समर कॅम्पमध्ये मुलांची सर्जनशीलता वाढविण्यासाठी वेगवेगळे कौशल्याधारित उपक्रम राबविण्यात आले. प्रत्येक मुलामध्ये एक खास कलागुण असतो तो ओळखण्याची संधी समर कॅम्प उपलब्ध करून देते. मुलांनी मोबाईलच्या आहारी न जाता अशा समर कॅम्पमध्ये सहभागी होणे आवश्यक आहे. पालकांनीही मुलांना मोबाईलपासून दूर ठेऊन सुट्ट्यांचा सदुपयोग त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी करावा.

अशोकराव चोरमले यांनी यावेळी मुलांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, पूर्वी भारतीय संस्कृतीत गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. गुरुकुल पद्धतीमध्ये मुले निवासी असायची त्यांना शिक्षणाबरोबरच इतर सर्व कलागुणांमध्ये निपुण केले जायचे. कालांतराने भारतामध्ये 'सर्व्हिस ओरीएनटेड' शिक्षणपद्धती आल्याने गुरुकुल ही संकल्पना बंद पडली. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे धावपळीच्या युगात विद्यार्थ्यांना पालकांचा हवा तेवढा सहवास मिळत नाही. त्यामुळे घरात आनंदी वातावरण कमी आढळते. मुले पूर्णपणे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. मोबाईलपासून दूर ठेऊन मुलांच्या कलागुणांना वाव देणारा पार्थ समर कॅम्प पुढील वर्षी अजून भव्य स्वरुपात आयोजित केला जावा अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.



एक आठवडा चाललेल्या पार्थ समर कॅम्प मध्ये पाथर्डी शहरातील एकूण १२२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मुलांना प्रशिक्षित क्रीडाशिक्षकांकडून हॉलीबॉल, क्रिकेट, आर्चरी, एरोबिक्स, योगा तसेच कुंभार कला, पॉट पेंटिंग, क्राफ्ट, सामान्यज्ञान, इंग्रजी फनी गेम्स, अबेकस, डान्स, सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. पर्यावरणपूरक संदेश म्हणून सर्व मान्यवरांना वनस्पती रोप भेट देण्यात आले. पार्थ समर कॅम्पसाठी कला शिक्षक दिपक राठोड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. विजय देशमुख, क्रीडाशिक्षक साईनाथ ढाकणे, सचिन माळवदे, भारत राठोड, ऋषी चौरे, गीता कोलते, पायल असलकर, प्रमोद हंडाळ, मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी, पर्यवेक्षक संपत घारे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, सतीश डोळे, संदीप धायतडक, विठ्ठल धस यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुणाल आव्हाड, सूत्रसंचालन ज्ञानेश्वर गायके यांनी केले तर संपत घारे यांनी आभार मानले.